# न जगलेले जीवन



## दाजी

पूज्य श्री बाबूजी महाराजांच्या

127 व्या जयंतीनिमित्त संदेश

29, 30 एप्रिल आणि 1 मे 2026

कान्हा शांतिवनम्



# न जगलेले जीवन

## भीतीने सोडून दिलेल्या गोष्टींना श्रद्धा कशी पुढे नेते

प्रिय मित्रांनो,

2026 च्या वसंतपंचमीदरम्यान प्रकाशित झालेल्या भंडारा संदेशांच्या मालिकेत, आपण आपल्या उत्क्रांतीमधील सहा अडथळ्यांचा ऊहापोह केला: इच्छा – वासना आणि आकांक्षा जेव्हा हृदयाला परस्परविरुद्ध दिशांना ओढतात, तेव्हा काय होते; ऊर्जेचे पुढे वाहत राहण्याचे कारण - उद्दिष्टच जेव्हा हरवून जाते, तेव्हा काय होते; अनुभूती झाल्यानंतरही, जेव्हा विश्वास निर्माण होत नाही, तेव्हा काय होते; प्राप्ती जेव्हा ओळख म्हणजेच अहंकार बनते, तेव्हा काय होते; नजर - लक्ष, जेव्हा स्वतःच्या जीवनाकडे राहण्याऐवजी, भरकटत दुसऱ्याच्या जीवनाकडे वळते, तेव्हा काय होते; आणि जेव्हा मन पूर्वापार चालत आलेल्या निष्कर्षांच्या चौकटीत बंदिस्त होते आणि स्वतःच्या रंगीत काचेलाच, स्वच्छ - स्पष्ट दृष्टी समजण्याची चूक करते, तेव्हा काय होते.

आता, आपण सर्वांत खोलवरच्या अडथळ्याकडे येत आहोत, जो इतर सर्व अडथळ्यांच्या आत लपलेला आहे.

एक जुनी बोधकथा आहे - एका माणसाने आपले संपूर्ण जीवन एका दरवाजाचे रक्षण करण्यात घालवले. तो जेव्हा तरुण होता, तेव्हा त्याला सांगण्यात आले होते की या

दरवाजाच्या मागे त्याला हव्या असलेल्या सर्व गोष्टी आहेत परंतु त्याचबरोबर त्याचा विनाश करू शकतील, अशा गोष्टीही तिथे आहेत. त्यामुळे तो पहारा देत राहिला आणि त्याने तो दरवाजा कायम बंदच ठेवला. तिथे पहारा देत देतच, तो म्हातारा झाला आणि अखेर, जेव्हा मृत्यू समोर येऊन ठेपला, तेव्हा त्याने देवदूताला विचारले, “ते खरे होते का? त्या दरवाजाच्या मागे खरोखरीच विनाश होता का?” देवदूताने तो दरवाजा उघडला, तेव्हा ती खोली रिकामी होती! ती सदैव रिकामीच होती.

भीती आपल्याला नेहमीच खऱ्या धोक्यांपासून वाचवत नाही. ती आपल्याला काल्पनिक धोक्यांपासूनही वाचवते आणि असे करताना, ती आपल्याला त्या खोलीत प्रवेश करण्यापासून रोखते, जिथे आपले खरे जीवन वाट पाहत असते.

## या सर्वांना जोडणारा धागा

पुढील विधान, आपण आत्तापर्यंत अभ्यासलेल्या प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचे एक नवीन स्वरूप - एक नवा दृष्टिकोन देऊ शकेल: भीती हे सातवे विष नव्हे, तर ते पहिले विष आहे. ती नेहमीच तिथे होती परंतु ती विभिन्न वेष धारण करून, विविध नावांनी कार्यरत होती.

आपण, पुन्हा एकदा, त्या विभाजित हृदयाकडे पाहूया: त्यातील उच्च लांडगाच, खऱ्या अर्थाने, जोपासण्यायोग्य आहे, हे स्पष्ट असूनही, एक साधक निम्न लांडग्याला का बरे खाऊ घालत राहतो? कारण उच्च लांडग्याला निवडणे म्हणजे जे ओळखीचे आहे,

भीती हे सातवे विष नव्हे, तर ते पहिले विष आहे. ती नेहमीच तिथे होती परंतु ती विभिन्न वेष धारण करून, विविध नावांनी कार्यरत होती.

सवयीचे आहे त्याला सोडून देऊन अशा प्रांतात पाऊल ठेवणे होय, जिथे परिणाम अनिश्चित आहे. वास्तविक, विभाजित हृदय हे इच्छेमुळे दुभंगलेले नसते, तर ते भीतीने दुभंगलेले असते; जर आपण एका बाजूची निवड केली तर काय गमावले जाईल याची भीती आणि एकदा का आपण तो पूल ओलांडला की आपल्याला परतीचा मार्ग उरणार नाही, ही भीती.

आता, आपण पुन्हा एकदा त्या सुप्त अग्नीकडे पाहूया: प्रत्येक कौशल्य, प्रत्येक संधी आणि प्रत्येक योजना असलेली तरुण व्यक्ती, हालचाल न करता - सुन्नपणे अंथरुणावर का पडून राहते? “माझ्या आतले काहीतरी मला पुढे जाऊ देत नाही,” ती म्हणाली. आपण याला आळस किंवा तमस म्हटले परंतु खऱ्या अर्थाने त्या अग्नीला कोणी घुसमटवून विझविले? भीती: जबाबदारीची भीती, तुम्ही खरोखर जागृत झाल्यावर काय होईल याची धास्ती, आणि प्रयत्नांती यशस्वी झालात, तर सतत यशस्वी व्हावे लागेल याची भीती; तसेच, प्रयत्न करूनही अपयशी ठरलात, तर तुमच्या मनात घर करून बसलेला तुमचा स्वतःबद्दलचा संशय, ते अपयश सार्थ ठरवेल, ही भीती. तो सुप्त अग्नी, स्वतःहून विझला नाही; तर भीतीनेच त्याला घुसमटवून विझविले आणि मग त्या राखेवर उभे राहून, तिने त्याला आळसाचे नाव दिले.

आपण पुन्हा एकदा, त्या तडा गेलेल्या पायाकडे वळूया: अशी साधिका जिने तब्बल अकरा वर्षे ध्यानसाधना केली होती तसेच तिच्या सभोवतालच्या प्रत्येकाला स्पष्टपणे

संशय म्हणजे बुद्धिमत्ता नव्हे; तर ती भूतकाळाविषयीची भीती आहे, जे दिले गेले आहे ते परत काढून घेतले जाऊ शकते, याची भीती आणि आपल्या पायाखालची जमीन, जी दिसते तितकी भक्कम नाही याची भीती. आपण त्याला संशय असे नाव दिले पण प्रत्यक्षात ते वस्तुनिष्ठतेचे नाटक करणारे लॅब कोट चढवून आलेले भयच आहे.

जाणवावे, असे लक्षणीय रूपांतरणही तिच्यात झाले होते तरीही ती असा प्रश्न का बरे विचारत होती, “हे खरे आहे का? खरोखरीच, काही बदलले आहे का?” कारण स्वतःच्या रूपांतरणावर विश्वास ठेवणे म्हणजे ते हिरावून घेतले जाण्याच्या शक्यतेला सामोरे जाणे, म्हणजेच स्वतःला असुरक्षित करणे - उघडे पाडणे आहे. संशय म्हणजे बुद्धिमत्ता नव्हे; तर ती भूतकाळाविषयीची भीती आहे, जे दिले गेले आहे ते परत काढून घेतले जाऊ शकते, याची भीती आणि आपल्या पायाखालची जमीन, जी दिसते तितकी भक्कम नाही याची भीती. आपण त्याला संशय असे नाव दिले पण प्रत्यक्षात ते वस्तुनिष्ठतेचे नाटक करणारे लॅब कोट चढवून आलेले भयच आहे.

अहंकाराने निर्माण केलेल्या त्या छताकडे पुन्हा एकदा पाहूया: अहंकार त्याने स्वतःच बांधलेल्या हरितगृहाच्या काचेच्या छताला भेदून बाहेर पडण्यास का नकार देतो? कारण खुल्या आकाशाला भिंती नसतात. हरितगृहाच्या बाहेरील वातावरण वास्तविक असते- खरा वारा, खरी वादळे आणि खरोखरची अनिश्चितता. अहंकाराची ही बंदिस्त चौकट - हे आवरण, खरे तर अभिमानापोटी नसते, तर सुरक्षिततेसाठी असते. जेव्हा ही काच फुटते, तेव्हा आपण पूर्णपणे उघडे पडतो. अहंकार म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून, प्राप्तीचा वेष पांघरलेली भीतीच असते.

आपण त्या उसन्या घेतलेल्या जखमेकडे, पुन्हा एकदा, पाहूया: हे मत्सरी हृदय स्वतःचे जीवन जगण्याऐवजी सतत दुसऱ्याच्या जीवनाकडे तिरप्या नजरेने का बघत असते? कारण आपले स्वतःचे जीवन जगणे म्हणजे एका अत्यंत भयावह प्रश्नाला सामोरे जाणे होय. तो प्रश्न हा की आपल्याला जे काही दिले गेले आहे ते पुरेसे आहे का आणि आपण स्वतः पुरेसे (सक्षम) आहोत का? मत्सर हा मुळात दुसऱ्याच्या ईश्वरदत्त क्षमतांबद्दल नसतोच; तर तो स्वतःला लाभलेल्या देणग्या अपुऱ्या आहेत की काय, या भीतीपोटी जन्माला येतो. मत्सर किंवा हेवा म्हणजे तुलनेचा मुखवटा चढवलेली भीतीच असते.



**तो तर या भीतीपोटी असतो की जर आपण खिडकी उघडली आणि असा एखादा रंग आत येऊ दिला, ज्याला आपण नावही देऊ शकत नाही, तर ज्या गोष्टींवर आपण आपली ओळख उभी केली आहे, त्या प्रत्येक गोष्टीचा पुनर्विचार करावा लागेल. पूर्वाग्रह म्हणजे दुसरे काही नसून निश्चिततेचा मुखवटा चढवलेली भीतीच असते.**

आणि पुन्हा एकदा, आपण पाहू न शकणाऱ्या त्या भिंतींकडे वळूया. हे मन वारशाने मिळालेल्या किंवा परंपरागत स्वीकारलेल्या निष्कर्षांमागे स्वतःला का कोंडून घेते आणि नवप्रकाशाला - नवनवोन्मेषाला आत येण्यास का मज्जाव करते? कारण खुलेपणा हा धडकी भरवणारा असतो. जगाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन अपूर्ण असू शकतो, हे मान्य करणे म्हणजे आपण ज्या पायावर उभे आहोत, तो पायाच अपूर्ण आहे, डळमळीत आहे, हे मान्य करणे होय. पूर्वाग्रह हा मुळात अन्य व्यक्तीबद्दल, अन्य धर्माबद्दल, अन्य समुदायाबद्दल किंवा पाहण्याच्या अन्य दृष्टिकोनाबद्दल नसतोच. तो तर या भीतीपोटी असतो की जर आपण खिडकी उघडली आणि असा एखादा रंग आत येऊ दिला, ज्याला आपण नावही देऊ शकत नाही, तर ज्या गोष्टींवर आपण आपली ओळख उभी केली आहे, त्या प्रत्येक गोष्टीचा पुनर्विचार करावा लागेल. पूर्वाग्रह म्हणजे दुसरे काही नसून निश्चिततेचा मुखवटा चढवलेली भीतीच असते.

या सात विषांच्या मुळाशी हा तोच थरकाप आहे - अस्तित्वाच्या असुरक्षिततेचे भय.

## पक्षाघाताचे स्वरूप

भीती अतिशयोक्तीच्या जोरावर कार्य करते. ती एखाद्या संभाव्य परिणामाला पकडते आणि त्याला इतके फुगवते की तो संपूर्ण क्षितिज व्यापून टाकतो. भीतीच्या अंमलाखाली, “जर मी अपयशी झालो तर?” ही एका अनर्थाची निश्चिती बनून जाते.

तसेच "जर त्यांनी मला नाकारले तर?" हे एक निर्विवाद सत्य बनते आणि "जर मी पुरेसा सक्षम नसेन तर?" हा अद्याप पूर्णपणे न जगलेल्या जीवनावरील अंतिम निकाल ठरतो.

कठोपनिषदात एका बालकाची - नचिकेताची कथा आहे, जो सर्वोच्च सत्याच्या शोधात, स्वेच्छेने, मृत्यूची देवता असलेल्या यमराजाच्या दारी गेला. जेव्हा नचिकेताच्या वडिलांनी एक पवित्र यज्ञ केला, तेव्हा त्यांनी आपल्याकडील जुन्या आणि निरुपयोगी वस्तू दान केल्या आणि सर्वोत्तम गोष्टी स्वतःसाठी राखून ठेवल्या. वडिलांच्या या अशा दानकर्मातील फोलपणा ओळखून नचिकेताने त्यांना तीन वेळा विचारले, "तुम्ही मला कोणाला दान करणार?" त्यावर त्याच्या वडिलांनी क्रोधाच्या भरात उत्तर दिले, "मी तुला मृत्यूला देतो."

आणि अशा प्रकारे, तो लहान मुलगा निघाला. एक लहान मुलगा, जो प्रत्येक प्रौढ व्यक्ती ज्याला सर्वांत जास्त घाबरते, त्याकडे निघाला होता - तो बेपर्वा होता म्हणून नव्हे, तर सत्याची त्याची ओढ, ही मृत्यूच्या भयापेक्षा कितीतरी मोठी होती म्हणून. नचिकेत जेव्हा तिथे पोहचला, तेव्हा मृत्यूचे दैवत यमराज तिथे उपस्थित नव्हते, त्यामुळे त्या मुलाने अन्नाशिवाय, निवाऱ्याशिवाय व धीर देणारे कोणीही सोबतीला नसताना, त्या यमराजाच्या दारी तीन दिवस आणि तीन रात्री प्रतीक्षा केली. जेव्हा यमराज परतले, तेव्हा त्या बालकाचे हे धैर्य पाहून ते अत्यंत प्रभावित झाले आणि त्यांनी त्याला तीन वर मागण्यास सांगितले.

ही श्रद्धेची सर्वात शुद्ध अभिव्यक्ती आहे; जेव्हा आत्मा एखादा गहन प्रश्न विचारत असतो, तेव्हा त्याचे अपूर्ण उत्तर स्वीकारण्यास दिलेला नकार म्हणजे ही श्रद्धा. ही केवळ निर्भयता नव्हे, तर ही अशी ओढ आहे, जी इतकी तीव्र झाली आहे की तिच्या तुलनेत भीती आता अगदी खुजी आणि क्षुल्लक वाटू लागली आहे.

नचिकेताने पहिला वर म्हणून आपल्या पित्याचा क्रोध शांत व्हावा, अशी मागणी केली. दुसरा वर म्हणून त्याने स्वर्गप्राप्तीकडे नेणारा अग्निविधी शिकण्याची इच्छा व्यक्त केली. हे दोन्ही वर प्रसन्नतेने, तत्क्षणीच दिले गेले परंतु तिसऱ्या वराने साक्षात मृत्यूलाही हादरवून सोडले: “माणसाचा मृत्यू झाल्यावर काय होते, ते मला दाखवा. आत्मा अस्तित्वात राहतो का? मला सत्य सांगा.”

यमराजांनी नचिकेताला अशा सर्व गोष्टींचे प्रलोभन दाखवून विचलित करण्याचा प्रयत्न केला, ज्या भीतीपोटी स्वीकारल्या गेल्या असत्या. त्यांनी त्याला धनदौलत, विशाल साम्राज्ये, दीर्घायुष्य, सुंदर अप्सरा आणि अकल्पनीय सुख - सर्वकाही देऊ केले. जगाच्या दृष्टीने मिळवण्यायोग्य असलेली प्रत्येक मौल्यवान गोष्ट त्या बालकाच्या चरणी अर्पण करण्यात आली. पण नचिकेताने त्या सर्व नाकारल्या आणि तो म्हणाला, “या सर्व गोष्टी नश्वर असतात. तुम्ही मृत्यूचे अधिपती आहात. इतर कोणापेक्षाही तुम्ही हे चांगलेच जाणून आहात. मला सांगा, असे काय आहे, जे अविनाशी आहे, ज्याचा कधीही अंत होत नाही?”

ही श्रद्धेची सर्वात शुद्ध अभिव्यक्ती आहे; जेव्हा आत्मा एखादा गहन प्रश्न विचारत असतो, तेव्हा त्याचे अपूर्ण उत्तर स्वीकारण्यास दिलेला नकार म्हणजे ही श्रद्धा. ही केवळ निर्भयता नव्हे, तर ही अशी ओढ आहे, जी इतकी तीव्र झाली आहे की तिच्या तुलनेत भीती आता अगदी खुजी आणि क्षुल्लक वाटू लागली आहे.

चारीजींनी या कथेवर चिंतन करताना, असे निरीक्षण नोंदवले की शिकण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी मृत्यू हा महान गुरू आहे. नचिकेताने त्याच्या मृत्यूच्या भीतीवर विजय मिळवला नाही; तर त्याला केवळ सुरक्षिततेपेक्षा ‘सत्याची’ अधिक ओढ होती आणि हीच ती गुरुकिल्ली आहे जी बंद दरवाजा उघडते: भीती नाहीशी करून त्यावर मात होत नाही, तर अशी गोष्ट जोपासल्याने त्यावर मात होते, जी भीतीला गौण ठरवते. आपल्या बालकाला वाचविण्याकरिता, आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या इमारतीत

धाव घेणारी माता, आगीच्या भयावर मात करण्यासाठी क्षणभरही थांबत नाही. तिचे निरपेक्ष प्रेम त्या भीतीपेक्षा कितीतरी मोठे, अपार असते. आग तीच, ती बदललेली नसते, तर ती माता बदललेली असते.

## न जगलेल्या जीवनाचे संस्कार

एखादे स्वप्न जगून, सरतेशेवटी अयशस्वी ठरलेल्या कोणत्याही स्वप्नापेक्षा, प्रयत्न न करताच विरून गेलेले प्रत्येक स्वप्न, ते पाहणाऱ्याला अधिक सातत्याने सतावते. हाच सुज्ञपणा परंपरांनी सदैव शिकविला आहे; अपूर्णतेचे संस्कार हे, अपयशाच्या संस्कारांपेक्षा अधिक खोलवर घाव घालतात. पूर्ण झालेल्या कृतीत, जरी तिचा शेवट दुःखद असला तरीसुध्दा, एक प्रामाणिकपणा असतो, जो मनाला शांत करतो, याउलट अर्धवट सोडलेल्या स्वप्नाच्या बाबतीत, असा प्रामाणिकपणा नसतो. मग, ते स्वप्न आपल्या चेतनेत जिवंत राहते, अनिर्णित अवस्थेत राहते व त्यामुळेच निरंतर तो प्रश्न विचारत राहते, ज्याचे उत्तर देण्यापासून भीती आपल्याला रोखते.

हार्टफुलनेसच्या संध्याकाळच्या शुध्दीकरण प्रक्रियेत, आपण बसतो आणि दिवसभरातील सर्व ठसे पाठीमागून निघून जाऊ देतो. आपण जे केले, जे बोललो, जे अनुभवले, ते सर्व आपण सोडून देतो परंतु आपण एका अशा गोष्टीचा विचार करूया, ज्यावर क्वचितच चर्चा होते: जे आपण केले नाही, त्यातून निर्माण होणाऱ्या संस्कारांचे काय? आपण टाळलेले संभाषण, आपण न बोललेले सत्य, आपण न उचललेले पाऊल आणि आपण व्यक्त न केलेले प्रेम अशा सर्व गोष्टीसुध्दा, ठसे - संस्कार मागे सोडतात. दिवसभरातील क्रियाकलापांतून उद्भवलेल्या संस्कारांपेक्षा, न केलेल्या गोष्टींतून उद्भवणारे संस्कार स्वच्छ करणे, ते काढून टाकणे अधिक अवघड असू शकते, कारण या घटना नसून त्या न घडलेल्या गोष्टी असतात - त्या सावल्या असतात आणि आपण सावल्या कशा झाडून काढू शकतो?

प्रत्येक वेळी जेव्हा भीती एखादी कृती रोखते, तेव्हा ती न घडलेली कृती अपूर्णतेचा एक संस्कार जमा करते. कित्येक महिने, वर्षे आणि दशकांदरम्यान साचत गेलेल्या संस्कारांची ही गाठोडी जडत्व निर्माण करतात. यातूनच तो तमस निर्माण होतो, जो वरकरणी आळस भासतो पण प्रत्यक्षात शक्य असूनही न जगलेल्या त्या जीवनाबद्दलचा शोक असतो.

प्रत्येक वेळी, जेव्हा भीती तुम्हाला एखादी गोष्ट करण्यापासून रोखते, तेव्हा ती टाळाटाळ करणे, थोडे सोपे होत जाते आणि तुमचे धैर्य आणखी कमकुवत होत जाते. प्रत्येक टाळलेल्या पावलागणिक, न जगलेल्या जीवनाचा भार वाढत जातो आणि याच न जगलेल्या जीवनाच्या ओझ्यामुळे, अखेरीस, पुढचे पाऊल टाकणे अशक्य वाटू लागते. तुम्ही पुढे जाऊ शकत नाही असे नव्हे, तर तुम्ही इतका काळ एकाच जागी स्थिर उभे राहिला आहात की आता तुमचे पाय जमिनीत जखडले गेले आहेत..

## आपल्याला काय तारून नेते?

आध्यात्मिक अर्थाने, श्रद्धा ही अनुभूतीतून आलेल्या विश्वासातून उगम पावते, पुराव्याशिवाय असलेल्या समजुतीतून नव्हे. साधक ध्यानसाधना करत असताना त्याला स्वतःपेक्षा श्रेष्ठ, असे एक निःसंदिग्ध अस्तित्व जाणवते, त्याला अशा एका



प्रत्येक वेळी जेव्हा भीती एखादी कृती रोखते, तेव्हा ती न घडलेली कृती अपूर्णतेचा एक संस्कार जमा करते. कित्येक महिने, वर्षे आणि दशकांदरम्यान साचत गेलेल्या संस्कारांची ही गाठोडी जडत्व निर्माण करतात. यातूनच तो तमस निर्माण होतो, जो वरकरणी आळस भासतो पण प्रत्यक्षात शक्य असूनही न जगलेल्या त्या जीवनाबद्दलचा शोक असतो.



**आध्यात्मिक अर्थाने, श्रद्धा ही अनुभूतीतून आलेल्या विश्वासातून उगम पावते, पुराव्याशिवाय असलेल्या समजुतीतून नव्हे. साधक ध्यानसाधना करत असताना त्याला स्वतःपेक्षा श्रेष्ठ, असे एक निःसंदिग्ध अस्तित्व जाणवते, त्याला अशा एका गोष्टीचा अनुभव येतो, ज्याचे स्पष्टीकरण भीती देऊ शकत नाही.**

गोष्टीचा अनुभव येतो, ज्याचे स्पष्टीकरण भीती देऊ शकत नाही. दिवसेंदिवस, वर्षानुवर्षे वारंवार होणारी ही अनुभूती, स्वप्न पाहणाऱ्याच्या पायाखाली असा पाया रचते, जो भीती खचवू शकत नाही.

हार्टफुलनेस प्रणालीमध्ये, प्राणाहुती भीतीमुळे निर्माण होणारा सापळा विरघळवून टाकते. त्यामुळे, जेव्हा ही प्राणाहुती हृदयात प्रवेश करते, तेव्हा ती भीतीशी वाद घालत नाही किंवा तिच्याविरुद्ध पुरावे सादर करत नाही; तर ती फक्त ती रिकामी जागा इतक्या वास्तविक व स्पष्ट, जाणवण्यायोग्य गोष्टीने (दिव्यतेच्या प्रवाहाने) भरते की आपल्यावरील भीतीचा पगडा जातो. जेव्हा कोणीतरी दिवा लावलेला असतो तेव्हा तुम्हाला अंधाराची भीती वाटत नाही. अंधारावर विजय मिळवलेला नसतो, तर त्याला अप्रस्तुत ठरवले जाते.

इथे सद्गुरूंची - मार्गदर्शकाची भूमिकाही महत्त्वाची आहे. ज्या खोलीत मूल कधीच एकटे गेले नसते, तिथे आई-वडिलांचा हात धरून ते सहज, निर्धास्तपणे जाते; खोली बदललेली असते म्हणून नव्हे, तर तो आश्वासक हातच मुलाला जाणीव करून देतो की खोलीत जे काही आहे त्याला सामोरे जाता येईल. आध्यात्मिक मार्गदर्शक स्वतःच्या उदाहरणातून हे आश्वासन देतात की हा मार्ग आधीही चोखाळला गेला आहे, बंद दरवाजाच्या मागे असलेली खोली रिकामी किंवा धोकादायक नाही, तर तुम्ही ज्याच्या



**आध्यात्मिक मार्गदर्शक स्वतःच्या उदाहरणातून हे आश्वासन देतात की हा मार्ग आधीही चोखाळला गेला आहे, बंद दरवाजाच्या मागे असलेली खोली रिकामी किंवा धोकादायक नाही, तर तुम्ही ज्याच्या शोधात आहात त्या चैतन्यानेच ती भरलेली आहे आणि त्यांचा आधाराचा हात - तो आश्वस्त करणारा हात त्यांनी पुढे केला आहे, जोपर्यंत तुम्हाला त्याची गरज असेल.**

शोधात आहात त्या चैतन्यानेच ती भरलेली आहे आणि त्यांचा आधाराचा हात - तो आश्वस्त करणारा हात त्यांनी पुढे केला आहे, जोपर्यंत तुम्हाला त्याची गरज असेल.

बाबूजींनी एकदा मानवतेचे इतक्या कोमलतेने वर्णन केले होते की ज्यामुळे आपण आतापर्यंत चर्चा केलेल्या प्रत्येक गोष्टीला एक नवीन स्वरूप मिळते. ते म्हणाले होते की सर्व माणसे ही लहान मुलांसारखी असतात, ज्यांना सतत आश्वस्त करण्याची गरज असते. आपल्याला जाणीव असो वा नसो, आपण सर्वजण आपल्या अंतरी युगानुयुगे चालत आलेली एक खोलवर रुजलेली भीती बाळगून असतो. आपल्या खऱ्या निवासापासून - परमधामापासून दूर असल्याने, आपल्याला एक पोकळी जाणवते, आज ना उद्या ती पोकळी भरून काढण्याची निकड भासणारच.

कृपया तो परिच्छेद पुन्हा वाचा. बाबूजींच्या दृष्टीने भीती हा काही चारित्र्यातील दोष नव्हे किंवा दुबळेपणाही नव्हे ज्याची लाज वाटावी, तर ती आपल्या मूळ स्रोतापासून दूर भरकटत गेलेल्या आत्म्याची- त्या अस्तित्वाची एक अवस्था आहे. तुम्हाला वाटणारी ही भीती म्हणजे भ्याडपणा नसून ती घरची ओढ आहे. आणि ज्या स्वप्नाचे तुम्ही बंद दाराआड रक्षण करत आहात, ती निव्वळ कल्पना नसून तुम्ही नेमके कोठून आला आहात याची स्मृती आहे, जी तुम्हाला पुन्हा स्वगृही परतण्याची साद घालत आहे.

## ते स्वप्न जे विरून जाण्यास नकार देते

अशी कोणती गोष्ट आहे, जी भीती तुम्हाला कळू देऊ इच्छित नाही? ती ही, की ज्या स्वप्नाचा तिने अंत केला असे तुम्हाला वाटले होते, ते अजूनही जिवंत आहे. ते तुमच्या त्या अनाकलनीय अस्वस्थतेत जिवंत आहे; अशा असमाधानात जिवंत आहे जे सर्व सुखसोयी असूनही पाठ सोडत नाही; आणि पहाटे तीनच्या प्रहरी, जेव्हा तुमची सर्व बचावात्मक आवरणे गळून पडतात आणि तुमचे हृदय तुमच्या अनुमतीशिवाय बोलू लागते, तेव्हा होणाऱ्या त्या विलक्षण हुरहुरीत ते जिवंत आहे. ती हुरहुर म्हणजे चिंता नव्हे, तर ते तुमचे स्वप्न आहे, जे आतून दार ठोठावत आहे आणि मुक्त होण्याची साद घालत आहे.

आणि असे कोणते रहस्य आहे ज्याचे रक्षण भीती सर्वात जास्त ईर्ष्येने करते? ते हे की तुम्हाला संपूर्ण अंतर कापण्याची मुळीच गरज नाही; तुम्हाला गरज आहे ती फक्त पहिले पाऊल उचलण्याची. भीती म्हणते की हे अंतर अनंत आहे परंतु श्रद्धा म्हणते की ते अंतर म्हणजे केवळ हे एक पाऊल, केवळ हा एक श्वास आणि केवळ आजच्या सकाळचे ध्यान आहे.



प्रत्येक आध्यात्मिक परंपरा हीच गोष्ट सांगते: तुमची निर्मिती ही भीती ज्या सीमा आखून देते, त्याहून कितीतरी उदात्त ध्येयासाठी झाली आहे. आत्म्याची क्षमता अनंत आहे. हा पिंजरा आपण स्वतःच रचला आहे; आणि ज्या दरवाजाचे तुम्ही जीवनभर रक्षण केले, तो बाहेरून कधीच बंद नव्हता, तर त्याला आतूनच कडी लावलेली होती.



भीती म्हणते की हे अंतर अनंत आहे परंतु श्रद्धा म्हणते की ते अंतर म्हणजे केवळ हे एक पाऊल, केवळ हा एक श्वास आणि केवळ आजच्या सकाळचे ध्यान आहे.

# संपूर्ण वर्तुळ

फेब्रुवारीमध्ये आपण संदेशांची ही श्रृंखला सुरू केली. सुरुवातीच्या संदेशात आपण पाहिले: असे हृदय - जे सुखकारक व श्रेयस्कर या द्वंद्वात कसे दुभंगलेले होते. त्यानंतर आपण पुढे पाहिले: एक असा अग्नी- जो आपले मूळ उद्दिष्ट विसरला होता; एक असा पाया - ज्याचा स्वतःवरच विश्वास उरला नव्हता; एक छत - जे अशा प्राप्तीतून बांधले होते, ज्याने वास्तविक आकाश खुले करायला हवे होते; एक जखम- जी दुसऱ्याच्या जीवनातून उसनी घेतली होती आणि तिला चुकून आपलीच मानली होती आणि अशा भिंती ज्यांच्या रंगीत काचा मुळात रंगीतच होत्या, हेच आपण पूर्णपणे विसरून गेलो होतो.

आता, आपल्याला या सर्वांना जोडणारा एक धागा सापडला आहे: भीती. इच्छा-वासना विभाजन करतात कारण आपल्याला निवड करण्याची भीती वाटते, जडत्व कायम राहते कारण आपल्याला जागृत होण्याची भीती वाटते, संशय पोखरतो कारण आपल्याला विश्वास ठेवण्याची भीती वाटते, अभिमान बंदिस्त करतो कारण आपल्याला खुल्या, अथांग आकाशाची भीती वाटते, मत्सर दुसऱ्याची जखम उसनी घेतो कारण आपल्याला स्वतःच्या अपुरेपणाची भीती वाटते, आणि पूर्वाग्रह खिडक्या कायमच्या बंद करतो कारण थेट उजेडात काय उघड होईल, याची आपल्याला धास्ती वाटते. आणि अखेर, भीती - या सहाही विकारांची जननी असलेली ती भीती दरवाजाला आतून कडी लावते व स्वतःलाच बंदिस्त करते, कारण आपण हे विसरलो आहोत की त्या दरवाजाच्या पलीकडे विनाश नसून तिथे ते चैतन्यमय जीवन आपली वाट पाहत आहे - असे जीवन, जे जगण्यासाठीच तर मुळात आपला जन्म झाला होता.

केवळ एका कृतीने ही चावी फिरते. ही अशी कोणतीही भव्य कृती नाही, जी एकाच वेळी संपूर्ण भीतीवर विजय मिळवेल; तर ते एक छोटे पण ठाम आणि अपरिवर्तनीय पाऊल आहे — आज नेमकी अशी एक गोष्ट करणे, जी करू नकोस असे भीती

**केवळ एका कृतीने ही चावी फिरते. ही अशी कोणतीही भव्य कृती नाही, जी एकाच वेळी संपूर्ण भीतीवर विजय मिळवेल; तर ते एक छोटे पण ठाम आणि अपरिवर्तनीय पाऊल आहे — आज नेमकी अशी एक गोष्ट करणे, जी करू नकोस असे भीती तुम्हाला बजावत होती.**

तुम्हाला बजावत होती. त्यामुळे, जेव्हा भीती म्हणेल की ध्यान करणे निरर्थक आहे, तेव्हा ध्यानाला बसा; जेव्हा भीती म्हणेल की सत्य बोलणे धोकादायक आहे, तेव्हा सत्य बोला; जेव्हा भीती म्हणेल की तुम्ही दुखावले जाल, तेव्हा नि:सीम प्रेम करा; आणि जेव्हा भीती म्हणेल की तुम्ही पडाल, तेव्हा पाऊल उचला.

हिम्मत ए मर्दा, मदद ए खुदा
जेव्हा आपण एक पाऊल उचलण्याचे धाडस करतो,
तेव्हा उर्वरित अंतर ईश्वर स्वत: पार करतो.

भीती विचारते, “जर असे झाले तर...?”.
श्रद्धा म्हणते, “जरी असे झाले तरीसुद्धा...” जे जीवन वाट पाहत आहे, ते जगण्यासाठी.

प्रेम व प्रार्थनेसह,
**कमलेश**

पूज्य श्री बाबूजी महाराजांच्या
127 व्या जयंतीनिमित्त संदेश
29, 30 एप्रिल आणि 1 मे 2026, कान्हा शांतिवनम्

# *There's More Waiting For You*

to go a little deeper

## HEARTFULNESS APP

A Quiet Place to Start

Carry your practice with you — download the free app and connect with a personal trainer  anytime.

Free Download. Daily practice. Trainer always Available.

Heartfulnessapp.org

## MASTERCLASSES

Go Deeper at Home

Learn with Daaji relaxation, meditation, cleaning, and prayer through three freely offered video sessions.

Free Videos. Learn from Daaji. 3 classes.

Heartfulness.org/global/masterclass

## RETREAT

Time for Just You

Step away from the noise and into a peaceful weekend that quietly deepens everything.

Peaceful Setting. Deepen Practice. Weekend Stays.

Heartfulness.org/global/retreat

## HEARTSPOTS

Find a Centre Near You

Your nearest meditation centre is closer than you think  at no cost.

6000+ Centres. Heartful Community. Free to Visit.

Heartspots.heartfulness.org

Scan to download the free app, always there when you need it.
Start with a guided session, and let the practice find its own rhythm in you.
The journey inward begins with a single, still moment.

heartfulness
purity weaves destiny